PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 3, ISSUE 2

# मराठी साहित्यातील ग्रामीण व देशी संकल्पनामधील समान तत्व: एकशोध

**डॉ. गजानन मुंधे**
**सहयोगी प्राध्यापक.**
**आप्पास्वामी महाविद्यालय, शेंदुरजना (आढाव)**
**ता. मनोरा जि. वाशीम**
**महाराष्ट्र भारत**

## प्रस्तावना:

साहित्य निर्मिती प्रकियेत लेखक हा अत्यंत महत्वाचा घटक असल्याने तो त्याच्या शक्ती व स्वभावानुसार आविष्कार करतो. त्या-त्या काळातील विचार, तत्वज्ञान या सारख्या गोष्टी वा घटक लेखकाच्या प्रकटीकरणावर परिमाण करतात, आणि त्यातून साहित्य क्षेत्रात विविध प्रवृत्ती प्रवाह निर्माण होत असतात.

साहित्यातील विविध प्रवृत्ती - प्रवाहाच्या निर्मिती बद्दल डॉ.नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात " एखादी जाणीव पुन्हा - पुन्हा प्रकट होत गेली की ती त्या प्रवाहाची अगर कालखंडाची जाणीव असे आपण म्हणायला लागतो ...... साहित्यला आकार देण्यात त्या जाणिवेचा फार मोठा वाटा असतो. किंबहुना त्यातूनच साहित्यातील वाद,प्रवाह, अगर प्रवृत्ती निर्माण झालेल्या दिसतील."१

साधारणता: विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून जगभर ज्या विविध संकल्पना साहित्य व समीक्षेचा प्रांतात येऊ लागल्या त्या याच जाणीवेतून.

**भूमिका:** महाराष्ट्रात १९६० नंतर अनेक नवे साहित्य प्रवाह निर्माण होऊन आज स्थिरावले आहेत. या प्रवाहातील ग्रामीण व देशी ह्या संकल्पना आज साहित्यात स्थिरस्थावर झालेल्या आहे. ग्रामीण व देशी या संकल्पना मराठी साहित्यात महत्वाच्या असल्याने या दोन संकल्पना मागील प्रेरणा, त्यांचे स्वरूप व त्याच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करून या संकल्पनांमध्ये

असलेल्या समान तत्त्वांचा व वैशिष्ट्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोध निबंधातून केला आहे.

ग्रामीण वा देशी या संकल्पनांमधील समान तत्त्वांचा व वैशिष्ट्यांचा शोध घेत असतांना प्रथम या संकल्पना समजून घेणे क्रमप्राप्त ठरते. त्या करिता मान्यवर अभ्यासकाच्या मतांचा परामर्श घेणे महत्त्वाचे आहे. ग्रामीण साहित्याचे अभ्यासक डॉ. आंनद यादव यांनी आपली ग्रामीण साहित्य संकल्पने विषयीची भूमिका विशद करतांना म्हटले आहे कि." ग्रामीण साहित्याची चळवळ ही महात्मा फुले यांच्या मानवातावादीचा, शुद्रातीशुद्रावर व स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाचा व त्यांच्या विकासाचा, छोटे शेतकरी, खंडकरी कुळे, कुणबी, शेतमजूर, खेड्यातून नागर विभागात पोटार्थी होऊन आलेले झोपडपट्टीवासीय मजूर, कामगार, दलित व आदिवासी यांच्या होणाऱ्या  शोषणाचा ती वारसा सांगते." या सर्वांचा विकास उद्धारार्थ काळाच्या ओघात ज्यांनी-ज्यांनी कार्य केले व विचार मांडले त्यांचा आणि त्यांच्या आवश्यक त्या विचारांचा ती वारसा सांगते."२

ग्रामीण साहित्याचे अभ्यासक डॉ. वासुदेव मुलाटे ग्रामीण साहित्य संकल्पने विषयी आपली भूमिका मांडताना म्हणतात." आजच्या ग्रामीण साहित्याला आणि त्याच्या चळवळीला महात्मा फुल्याच्या बरोबरच राजर्श्री शाहू, विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचे तर आधिष्ठान आहेच परंतु आगरकर, टिळक, महात्मा गांधी, इ. राष्ट्रीय विचारांचे ही आधिष्ठान आहे. मानवी महत्ता वाढवणारे, सर्वपरिच्या शोषनाविरुध आवाज उठविणारे, दिन - दुबळ्यांना बळ प्रदान करणारे विचार ग्रामीण साहित्याचे अधिष्ठान आहे."३

डॉ. यादव व डॉ. मुलाटे यांच्या ग्रामीण साहित्य संकल्पने विषयीच्या विचारातून हे साहित्य एकंदरीत बहुजनपरंपरा व बहुजन विचार विकासासाठी कटीबद्ध असल्याचे स्पष्ट होते.

मोहन पाटील म्हणतात,"ग्रामीणत्वाच्या अर्थातून प्रकटणारी संस्कृती धारा म्हणजे आपली लोकसंस्कृतीच आहे.:४ म्हणजेच ग्रामीण साहित्य लोकसाहित्याला आपली संस्कृती मानते.

ग्रामीण साहित्याने स्वीकारलेल्या वरील वैचारिक भूमिकेचा विचार करता ग्रामीण साहित्य हे इथल्या अवैदिक परंपरेशी आपले नाते सांगते. गौतमबुद्ध, संत तुकाराम यांच्या मानवतावादी विचारांना मानते.

एकंदरित ग्रामीण साहित्य संकल्पनेत लोकसंस्कृती, कृषीसंस्कृती, बहुजन विचार, मूलनिवास, दलित, आदिवासी, दिन - दुबळ्या शोषितांच्या विचार स्वातंत्र्याला महत्त्व देऊन त्यांच्या साठी लढा उभारते, भाषिक, वैचारिक, सामाजिक, सांस्कृतिक, वाङ्मयीन, अश्या सर्व पातळ्यांवर अभिजनांकडून डावलल्या गेलेल्या सर्वांना आपल्यात सामाऊन घेते. त्या-त्या प्रदेशाची भाषा व भाषेतून साहित्य निर्मिती व्हावी याला या संकल्पनेत महत्त्व असल्याचे दिसून येते.

**देशीयता** :- १९६०-८० च्या दशकात निर्माण झालेल्या 'देशी' या संकल्पने विषयी व मराठी साहित्यात आलेल्या देशिवादाचे श्रेय ज्यांना दिले जाते त्या भालचंद्र नेमाडेंना अभिप्रेत असलेली देशीयता ही संकल्पना काय आहे. या विषयी नेमाडे म्हणतात, " देशी ह्याचा अर्थ त्या-त्या भूमीशी जोडलेला असणे असा प्राय: होतो ..... देशी नसलेल्या परक्या, बाहेरून येणाऱ्या अनेक मूल्यांचे भाषांचे, संस्कृतीचे, देशी मूल्यावर जेव्हा आक्रमण होते, तेव्हा ते स्वत:च्या अस्तित्वासाठी मानवी समूहांना देशीवादी व्हावे लागते. वस्तुत: देशीपणा ही अत्यंत स्वयंभू, झाडाझुडपासारखी, शोशिकपणे आपआपल्या जागेवर उगवणारी व टिकून राहणारी संकल्पना आहे. "५

आधुनिक मराठी साहित्यात साठोत्तरी कालखंडात माडल्या गेलेल्या. 'देशी' या संज्ञेचे मुळ प्राचीन भारतात वापरात होते या विषयी डॉ. गणेश देवी म्हणतात, " देशी ही संज्ञा प्राचीन भारतात विविध बोली भाषाच्या भौगोलिक परिसीमा वर्णन करण्यासाठी वापरता आली, "६

डॉ. गणेश देवी देशियतेचा उगम प्राचीन भारतात असल्याचे सांगतात तर काही अभ्यासक देशीयता ही संकल्पना उत्तर अमेरिकेतील nativisam या संकल्पनेतून घेतली आहे असे मत मांडतात.

भारतीय किवा मराठी साहित्यातील 'देशियेतेचा' उगम कसा झाला या बद्दल डॉ. वासुदेव सावंत म्हणतात, " स्पर्धात्मक व अर्थकेंद्रित अश्या आजच्या जीवनपद्धतीला आणि तिला आधारभूत असणाऱ्या नव्या मुल्यव्यवस्थेला सामोरे जाताना गावातल्या माणसांची मोठीच कुचंबना होते. नव्या व्यवस्थेशी नीट जुळवून न घेता आल्याने स्वतःविषयी न्यूनगंड निर्माण होऊ शकतो अशा कुचंबनेमुळे आणि न्यूनगंडामुळे आजच्या या लेखकांपुढे एक प्रकारचा identify crysis उभा राहिलेला आहे. देशीवादी साहित्यसिद्धांत हा या क्राय सिसमधून जन्माला आलेला आहे. या क्रायसिसमधून बाहेर पडण्याससाठी शोधलेला एक मार्ग म्हणजे देशीवाद होय असे म्हणता येईल, देशीवादा मागील हे संदर्भ लक्षात घेतले तर देशीवाद म्हणजे इंग्रजीतील nativisam चा मराठी अवतार नव्हे हे समजून घेणे अवघड नाही."६

एकूणच देशीमूल्यांवर, भाषांवर व संस्कृतीवर होणाऱ्या आक्रमणाना तोंड देण्यासाठी देशीयेतेचा जन्म झाल्याचे दिसते.

मध्युगीन महारातष्ट्रात सुद्धा संतानी देशीपनाला महत्त्व दिल्याचे स्पष्ट होते. स्वामी चक्रधर, संत नामदेव, संत ज्ञानेश्वर. संत तुकाराम यांचे विचार व भाषा देशीच होती.

भाषेतून ते कलाविष्कारापार्यंत जे-जे लोकपरंमपरेशी, बहुजनांच्या संस्कृतीच्या निगडीत आहे. ते सर्व देशी या शब्दाने ओळखला जाते.यावरून देशीयतता ही संकल्पना बहुजन संस्कृती आणि या संस्कृतीने निर्माण केलेली मूल्यव्यवस्था केंद्रस्थानी मानते. देशीयेता म्हणजे दडपल्या गेलेल्या सांस्कृतिक जाणीवांना आत्मभान देणे. चळवळी उभारणे व त्या माध्यमातून बहुजनांच्या सर्वस्तरावरील समस्याचे भान जपणे हे देशीयेतेला अपेक्षित आहे.

एकदा देशिपणाचे महत्त्व स्वीकारले कि, भालचंद्र नेमाडे म्हणतात त्या प्रमाणे, " पहिली जबाबदारी म्हणजे जगभराच्या वावड्या न उडवता प्रथम आपल्या घराजवळची, वस्ती आपला गाव प्रांत ह्यावर आधी लक्ष केंद्रित करावे," ८

वासुदेव सावंत म्हणतात, देशीयता ही गौतमबुद्धाची करुणा, तुकारामादी, संतांचा इहवादी नसणारा मानवतावाद, संत कबिरांचा सर्वधर्मसमभाव, धर्माच्या अंगाने उभा राहणारा मा. फुले डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सामजिक क्रांतीवाद. मा. गांधीजी अहिंसा या मूल्यांनी प्रेरित झालेले साहित्य हेच देशीवादाला अभिप्रेत असलेले साहित्य आहे. "९

## निष्कर्ष:-

ग्रामीण वा देशी या संकल्पनेविषयी मान्यवर अभ्यासकांच्या मतांचा विचार करता या दोन्ही संल्पने मागील प्रेरणा, स्वरूप व वैशिष्ट्यांमध्ये बहुतांश साम्यच दिसून येते.

ग्रामीण व देशी या दोन्ही संकल्पना लोकसाहित्याशी आपले घट्ट नाते सांगते. बहुजनपरंपरा व समूह जीवनातून वाहणाऱ्या तत्त्वांना ह्या संकल्पना आपल्यात अंतर्भूत करतात. एखाद्या प्रबळ सांस्कृतिक आक्रमनामुळे आपले अस्तित्व धोक्यात येऊ नये या साठी देशीयता ही लढाऊवृत्ती व आक्रमकपणा धारण करते तर ग्रामीणता ही इथल्या भूमिपुत्रांच्या प्रश्नासाठी आक्रमक होते.

लढाऊवृत्ती व आक्रमकता ही वैशिष्टे दोन्हीमध्ये समान आहे.

ग्रामीण व देशी या संकल्पेचे लक्ष एकच आहे. ते म्हणजे अभिजांकडून सामजिक, सांस्कृतिक, आर्थिक, भाषिक या सर्व स्तरावर दडपल्या गेलेल्या बहुजनातील शोषितांच्या उत्थानासाठी साहित्य चळवळीच्या माध्यमातून कार्य करणे.

या दोन्ही संकल्पना गौतमबुद्ध, संत तुकाराम, मा. फुले डॉ. आंबेडकर मा. गांधी या बहुजन विचार मांडणाऱ्या व त्यांच्या साठी कार्य करणाऱ्यांना आपले प्रेरणा स्रोत मानते.

देशियेताचा जन्म जसा स्पर्धात्मक आणि अर्थकेंद्रित अशा जीवनपद्धतीला सामोरे जातांना होणाऱ्या कुंचबनेतून वा न्यूनगंडांतून निर्माण झाला तसाच ग्रामीणतेचा जन्म शोषण, दारिद्रय व आधुनिकतेच्या व जागतिकीकरणाच्या नावाने होत असलेल्या कुंचबनेपोटी झाला.

भाषेचा मुद्दा वास्तवाच्या आकालनाशी संबंधित असल्याने कृत्रीम मराठीतून चांगले सर्जन होणे. अशक्य आहे. हीच भूमिका ग्रामीण साहित्याची आहे. त्या-त्या प्रादेशिक भाषेला व बोलीला केंद्रस्थानी ठेवून तिथल्या माणसाचे दु:ख त्याच शब्दात मांडले पाहिजे असे ग्रामीण साहित्य मानते.

आशय व अभिव्यक्ती च्या बाबत या दोन्ही संकल्पनामध्ये बरेच साम्य आढळते.

## सारांश:-

भाषे पासून ते कालाविश्वापर्यंत जे जे लोकपरंपरेशी, बहुजनांच्या संस्कृतीशी निगडीत आहे. कुठल्याही जाती- धर्माला बांधले न गेलेले व समग्र मानवजातीला मानवतावादाच्या कसोटीवर स्वीकारणे हे समानतत्त्व ग्रामीण व देशी या संकल्पनेचा आत्मा आहे.

-x-

## संदर्भ टिपा :-

१) समीक्षेतील नव्या संकल्पना - संपा. मनोहर जाधव. प्रस्तावना, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले. स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद. प्र. आ.२००१.पृ क्र. ३-४

२) साहित्य : ग्रामीण आणि दलित संपा. डॉ. इश्वर नंदापुरे (ग्रामीण सा. सैधितीक भूमिका प्रा. गणेश देशमुख.) विजय प्रकाशन, नागपूर प्र. आ. २००२. पृ.क्र. १८

३) ग्रामीण साहित्य स्वरूप आणि संस्कृती. मोहन पाटील, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद प्र. आ. १९९४ पृ. क्र. २१ व ४६

४) ग्रामीण साहित्य आणि संस्कृती. मोहन पाटील, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद. प्र.आ. २००२.पृ. क्र ४०

५) टिका स्वयवर. श्री, के, क्षीरसागर.१९९० साकेत प्रकाशन, औरंगाबाद, पृ क्र.१०८

६) समीक्षेतील नव्या संकल्पना. संपा, डॉ.मनोहर जाधव (देशीयतावाद. डॉ. गणेश देवी.) प्रकाशन औरंगाबाद, प्र. आ. २००१ पृ १८४.८५

७) तत्रैव पृ. १९०

८) टिका स्वयवर. श्री, के, क्षीरसागर.१९९० साकेत प्रकाशन, औरंगाबाद, पृ क्र.१०८

९) समीक्षेतील नव्या संकल्पना. संपा, डॉ.मनोहर जाधव (देशीयतावाद. डॉ. गणेश देवी.) प्रकाशन औरंगाबाद, प्र. आ. २००१ पृ १८४.८५

## संदर्भ ग्रंथ :-

१) साठोत्तरी मराठी वांङ्मयातील प्रवाह, डॉ शरण कुमार लिबांडे

२) मराठी जनसाहित्य संपादक डॉ. रा.गो. चवरे

३) साहित्य : ग्रामीण आणि दलित संपादक ईश्वर नंदापुरे